**अधिष्ठाता, निम्न कृषि शिक्षण,**
**डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला -४४४१०४**

**डॉ.बी.व्ही. सावजी**
एम.एस्सी. (कृषि) पी.एच.डी.

ई-मेल-**adlae@pdkv.ac.in**

**क्रं. अ./ निकृशि/ प्रवेश/४३१ /२०२०** **दिनांक -08 /10 /२०२०**

## परिपत्रक

**विषय- कृषि तंत्र पदविका (दोन वर्ष,मराठी माध्यम) अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया २०२०-२१ तात्पुरती स्थगित करणेबाबत.**

**संदर्भ - परिपत्रक मकृप /शिक्षण-१/२२३ दिनांक -११ सप्टेंबर ,२०२०**

शैक्षणिक सत्र २०२०-२०२१ करिता कृषि तंत्र पदविका (दोन वर्ष,मराठी माध्यम) अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया १७/०८/२०२० पासून सुरू करण्यात आलेली आहे. कृषि व पदुम विभागाच्या शासन परिपत्रक अनुसरून सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्गाकरिता (SEBC) उक्त प्रवेश प्रक्रियेमध्ये १२ टक्के जागा आरक्षित करण्यात आलेल्या आहेत. तथापि,मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०९/०९/२०२० रोजी सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्गाच्या (SEBC) आरक्षणास अंतरिम स्थगिती दिली आहे. त्याअनुषंगाने महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी कृषि तंत्र पदविका (दोन वर्ष,मराठी माध्यम) प्रवेश प्रक्रिया २०२०-२०२१ ला तात्पुरत्या स्वरुपात स्थगिती दिली आहे.

त्यास अनुसरून विद्यापीठ अंतर्गत प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय व विद्यार्थ्यांना या परिपत्रकाद्वारे अवगत करण्यात येते की, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे कार्यालयाकडून पुढील आदेश येईपर्यंत कृषि तंत्र पदविका (दोन वर्ष,मराठी माध्यम) अभ्यासक्रमाची शैक्षणिक सत्र २०२०-२०२१ ची प्रवेश प्रक्रिया तात्पुरत्या स्वरुपात स्थगित करण्यात येत आहे.

अधिष्ठाता
निम्न कृषि शिक्षण
डॉ. पं. दे. कृ. वि.,अकोला

प्रतिलिपी माहीतीस्तव.

१) मा. संचालक (शिक्षण), डॉ. पं. दे. कृ. वि.,अकोला.
२) मा. कुलसचिव, डॉ. पं. दे. कृ. वि.,अकोला.
३) मा. कुलगुरू यांचे स्विय सहायक यांना मा. कुलगुरू यांचे अवलोकनार्थ सविनय सादर .
४) प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय ____________________ यांना सदर परिपत्रक कार्यवाही करिता अग्रेषित.